Peer Reviewed International Research Journal of Geography
Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika
ISSN : 0971-6785 {Impact Factor 2.561 (IIFS)} Vol. 33, No.1, Jan-Jun. 2016. pp 111 - 114

# A GEOGRAPHICAL STUDY OF POPULATION IN YAVATMAL DISTRICT

K. A. Deshpande

***Abstract :***

*Population is an important factor for the ecomomical, social, political & cultural development of any geographical region. Regional Population is an equal important factor as other natural productive factor. Percentage of Population in rural area is always more in agricultural conutry. So the people those are depended an agriculture live in rural area. It is also seen in Yavatmal district. According to the census of 2001 eight tahsils amond sixteen tahsils of Yavatmal district are classified into urban area. They are Yavatmal, Wani, Kelapur, Ghatanji, Umarkhed, Pusad, DIgras & Darwha.*

**बीजसंज्ञा : लोकसंख्या, लोकंसच्येची घनता, स्त्री व पुरूष लोकसंख्या, ग्रामीण व नागरी लोकसंख्या.**

**प्रस्तावना :**

यवतमाळ जिल्हा हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या जिल्ह्याचा इतिहास अत्यंत प्राचीन असून येथे आदिवासी व ग्रामीण वस्त्यांमध्ये सुध्दा पंरपरागत संस्कृतीची आत्यंतिक विविधता आढळते. त्याचप्रमाणे भौगोलिक स्वरूपातही येथील डोंगराळ व पठारी भूपृष्ठामुळे टोकाची विविधता आलेली आहे. यवतमाळ जिल्हा जरी थोडा मागास, विकसनशील दिसत असता तरी जिल्हयाच्या या सर्वच जीवन प्रवासाचा आरंभ असणाऱ्या लोकसंख्या या घटकाचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

**उद्दिष्टये :** प्रस्तुत शोधनिबंधामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील १९८१ ते २००१ या तीन दशकातील लोकसंख्या वाढीचा अभ्यास करणे.

**माहिती स्त्रोत व संशोधन पध्दती :**

यवतमाळ जिल्हयातील लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास करण्याकरिता द्वितीयक स्वरूपाच्या माहितीचा उपयोग करण्यात आलेला आहे. ही माहिती यवतमाळ जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जनगणना पुस्तिका यवतमाळ येथून मिळविलेली आहे. प्राप्त माहिती १९८१,१९९१ व २००१ या वर्षाची असून प्रत्येक तालुक्यातील लोकसंख्येची घनता काढून तीन दशकातील वाढ छाया पध्दतीच्या नकाशाद्वारे प्रदर्शित करण्यात आली आहे. तसेच ग्रामीण व नागरी लोकसंख्येतील बदलाची कारणे शोधून त्याचे भौगोलिक स्पष्टीकरण केले आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

यवतमाळ जिल्हयाचे क्षेत्र विस्तृत असून यवतमाळ जिल्हयाच्या उत्तरेला व दक्षिणेचा नैसर्गिक सिमा प्राप्त झाल्या आहेत. या जिल्हयाच्या उत्तरेस वर्धा नदीमुळे वर्धा व चंद्रपूर जिल्हे तसेच दक्षिणेस पैनगंगा नदीमुळे नांदेड जिल्हा व आंध्र प्रदेश राज्यवेगळे झाले आहे.

यवतमाळ जिल्हयाचे क्षेत्रफळ १३,५८४ चौ.कि. मी. असून यवतमाळ जिल्हा १६ तालुक्यांमध्ये विभागला आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी ४.४% इतका भूभाग या जिल्हयाने व्यापला आहे. हा जिल्हा १९°२६' उत्तर ते २०°४२' उत्तर अक्षांश आणि ७७°१८' पूर्व ते ७९°९' पूर्व रेखांश या दरम्यान वसलेला

आहे. सन २००१ नुसार जिल्हयाची लोकसंख्या ही २४,५८,२७१ इतकी आहे.

**विवेचन आणि स्पष्टीकरण :**

यवतमाळ जिल्हयातील १९८१ ते २००१ या वर्षीच्या लोकसंख्येची तुलना करता असे निदर्शनास येते की १९८१ च्या जगनणनेनुसार यवतमाळ जिल्हयाची एकूण लोकसंख्या १७३७४२३ असून त्यात ५१.०७% पुरूषांची संख्या तर ४८.९३% स्त्रियांची संख्या आहे. १९९१ च्या आकडेवारीनुसार यवतमाळ जिल्हयाची एकूण लोकसंख्या २०७७१४४ इतकी आहे. त्यापैकी ५१.२३% पुरुषांची संख्या असून ४८.७७% संख्या स्त्रियांची आहे. एकूण लोकसंख्येपैकी ८२.८१% लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहत असून १७.१९% लोकसंख्या ही नागरी भागातून राहते. लोकसंख्येचे हे प्रमाण २००१ मध्ये वाढलेले असून २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयाची एकूण लोकसंख्या २४,५८,२७१ इतकी असून त्यापैकी ५१.२३% ंपुरूष व ४८.४९% स्त्रियांची लोकसंख्या आहे. एकूण लोकसंख्येपैकी ८१.४१% लोकसंख्या ग्रामीण भागात व १८.८५% लोकसंख्या नागरी भागात राहते. जिल्हयात यवतमाळ तालुक्यात सर्वाधिक लोकसंख्या असून त्यामध्ये सतत वाढ होत गेलेली दिसून येते.

**सारणी क्र :१**

**यवतमाळ जिल्हयातील लोकसंख्येची वैशिष्टये**

| वर्ष | १९८१ | | | १९९१ | | | २००१ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विशेष | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी |
| एकूण लोकसंख्या | १७३७४२३ | १४७५२८८ | २६२१३५ | २०७७१४४ | १७२०२१३ | ३५६९३१ | २४५८२७१ | २००१०६० | ४५७२११ |
| पुरूष लोकसंख्या | ८८५०१२ | ७४८०७७ | १३६९३५ | १०६४४२२ | ८७९०१७ | १८५४०५ | १२६५६८१ | १०२९५४० | २३६१४१ |
| स्त्रि लोकसंख्या | ८५२४११ | ७२७२११ | १२५२०० | १०१२७२२ | ८४११९६ | १७१५२६ | ११९२५९० | ९७१५२० | २२१०७० |

स्त्रोत – जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन यवतमाळ (२००७–०८)

जिल्हयात १९८१ च्या ग्रामीण लोकसंख्येनुसार पुसद व दिग्रस तालुक्यात लोकसंख्या ही सर्वाधिक असून १९९१ ला उमरखेड पुसद व दिग्रस या तीन तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे तर २००१ मध्ये उमरखेड व पुसद या दोन तालुक्यात हे प्रमाण सर्वाधिक दिसूनयेते.

नागरी लोकसंख्येचा विचार करता, यवतमाळ जिल्हयात एकूण १६ तालुक्यापैकी २००१ नुसार ८ तालुके हे नागरी वर्गवारीत मोडतात. १९८१ च्या एकूण नागरी लोकसंख्येच्या आकडेवारी नुसार ३३.९७% म्हणेच सर्वाधिक नागरी लोकसंख्या यवतमाळ तालुक्यात होती. तर सर्वात कमी नागरी लोकसख्या ही घाटंजी तालुक्यात होती. १९९१ च्या आकडेवारीनुसार यवतमाळ तालुक्यात ३९.१७% नागरी लोकसख्या असून ती व पुसद या तालुक्यातील नागरी विभागातही हे प्रमाण जास्त आहे.

१९८१ च्या जनगणनेनुसार यवतमाळ तालुका उच्चत्तम घनतेचा असून सर्वात कमी घनतेचे विभाग कळंब, राळेगांव, मारेगांव, घाटंजी, महागांव, उमरखेड हे आहेत. येथील घनता दर चौ.कि. मी. ला १२५ पेक्षाही कमी आहे. पुसद, दिग्रस, केळापूर, वणी, बाळुळगांव, नेर, दारव्हा येथील लोकसंख्येची घनता दर चौ.कि. मी.ला १२५ ते १७५ आहे.

१९९१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या घनतेचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, यवतमाळ तालुक्याची घनता सर्वाधिक आहे. पुसद व दिग्रस तालुक्यात लोकसंख्येच्या घनतेचे प्रमाण दर चौ.कि. मी. ला १८० ते २०० दरम्यान आहे. तर कळंब, राळेगांव, मारेगांव, घाटंजी, नेर येथे न्यूनतम घनता असून दर चौ.कि. मी.ला येथील घनतेचे प्रमाणे १२५ पेक्षाही कमी आहे. २००१ ची यवतमाळ जिल्हयाच्या लोकसंख्येची घनता दर चौ.कि. मी.१८१ इतकी आहे. यवतमाळ तालुक्याची लोकसंख्येची घनता जिल्हयात सर्वाधिक म्हणजे ३२७ इतकी आहे. तर मारेगाव तालुक्याची घनता जिल्हयात सर्वात कमी म्हणजे ६३ इतकी आहे. सर्वसाधारण घनतेचा विचार करता कळंब, मारेगाव, झरीलामणी, घाटंजी व दिग्रस या पाच तालुक्यांमध्ये हे प्रमाण दर चौ.कि. मी.ला १२५ पेक्षाही कमी आहे. त्याचप्रमाणे बाभुळगाव, राळेगाव, केळापूर, महागाव, नेर या पाच तालुक्यांमध्ये लोकसंख्येची घनता दर चौ.कि. मी.ला १२५ ते १७५ इतकी आहे. १९८१, १९९१ व २००१ या वर्षांच्या जनगणनेनुसार एकमेव यवतमाळ तालुका असा येतो की जेथे घनता जिल्हयात सर्वाधिक आहे.

**निष्कर्ष :**

१) प्रस्तुत जिल्हयातील एकूण लोकसंख्येचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, येथे सर्वात जास्त लोकंसख्या (१९८१, १९९१ व २००१ )ला यवतमाळ तालुक्याचीच आहे त्याचे कारण असे की यवतमाळ हा प्रस्तुत तालुका जिल्हयाचे केंद्र असून येथे सर्व सोयी व सुविधांचा विकास झालेला असल्यामुळे येथे लोकसंख्येचे केंद्रिकरण अधिक आढळून येते.

२) जिल्हयात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण पुसद या तालुक्यात (१९८१, १९९१ व २००१ )सर्वात जास्त असून नागरी लोकसंख्येचे प्रमाण यवतमाळ तालुक्यात सर्वाधिक आहे.

३)१९८१, १९९१ व २००१ नुसार यवतमाळ जिह्यातील एकूण लिंग गुणोत्तर प्रमाण पाहिले असता येथे सर्वच तालुक्यात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी आहे तसेच हे चित्र ग्रामीण व नागरी भागात सुध्दा आढळून येते.

४) जिल्हयातील लोकसंख्येच्या घनतेचा अभ्यास केला असता दिसून येते की, १९९१ च्या तुलनेत लोकसंख्येची घनता १९८१ ला बरीच कमी आहे मात्र तालुका निहाय घनता वितरणात फारसा फरक आढळून येत नाही. २००१ ला या आकडेवारीत वाढ झालेली दिसत असून यवतमाळ तालुक्यात

लोकसंख्येची घनता (१९८१, १९९१ व २००१)सर्वाधिक आहे. जिल्हयाच्या पूर्वेकडील भागात लोकसंख्या घनतेचे प्रमाण कमी असलेले दिसते. हे विभाग थोडे ग्रामीण विभागात मोडत असून शेती व्यवसाय हा येथे प्रमुख आहे. रस्त्यांचा म्हणावा तसा विकास झालेला नसून शैक्षणिक सोयीची उपलब्धता ही कमी असल्यामुळे लोकसंख्येची घनता येथे कमी असावी.

**संदर्भ :**


- Clarke Joha (1997) The Future of Population, Predictions series, Phienix, London Pp. 7-21.
- Govt. of Maharashtra (1991) Disrict Census Handbook, Yavatmal District for 1991.
- Govt. of Maharashtra (1989-90,1991-92,2007-08): Socio economic abstract-yavatmal District, Dept. of Finance and statistics, Govt. of Maharashtra Mumbai.
- Kayashtha SL (1988) "Geography of Population," Rawat Publication, Jaipur Pp 27-85.


***डॉ. सौ. कल्याणी अभय देशपांडे**
लोकनायक बापूजी अणे विद्यालय,
यवतमाळ